## बजाज इलेक्ट्रिकल्सला अल्प नफा

पुणे : बजाज इलेक्ट्रिकल्स लिमिटेडने ३१ मार्च २०१३ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात एकूण उत्पन्नात ९.३ टक्के वाढ करीत ३३८७ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे. कंपनीने तिमाही अखेरही ५.१ टक्के वाढ करीत १११३ कोटींचे उत्पन्न मिळवले आहे. एकूण नफ्यात मात्र केवळ १ कोटीची अल्प वाढ झाली असून, निव्वळ नफाही अवघा ६२ लाख इतका आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत हे प्रमाण खूपच कमी आहे. कंपनीने २ रुपये प्रतिसमभाग लाभांश जाहीर केला आहे. कंपनीच्या एकूण व्यवसायात गृहोपयोगी वस्तूंच्या विक्रीचे प्रमाण २२.४ टक्के, तर १४.९ टक्के विद्युत उपकरणांचे आहे.